# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०९/२०१७/ 0006

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : १६.१०.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : १३.११.२०१७ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : १५.१२.२०१७ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : ११.०१.२०१८ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०९/२०१७**

**अपीलकर्ता :** श्री. अनिल वेदव्यास गलगली,

**विरुद्ध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक १६/१०/२०१७ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. प्रतिवादी पत्र दिनांक १३/११/२०१७ ला अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक १५/१२/२०१७ ला वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १९/१२/२०१७ ला नोटिस पाठवून अपिल सुनावनीची संधी दिली व दिनांक ०४/०१/२०१८ ला अपिलार्थी व प्रतिवादी यांना आपले समक्ष बाजू मांडण्याची संधी दिली. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहून आपले मौखिक म्हणणे अपिलीय अधिकारी यांचे समक्ष सादर केले.

३) माहिती अर्ज लक्षपूर्वक गृहित धरुन व त्याला प्रतिवादी यांचे आदेश/उत्तर व या अपिलातील मुद्यांना धरुन नास्तितील पुराव्याच्या आधारे अपिल निकाली काढण्यात येत आहे.-

**मागितलेली माहिती:-**

१. मुंबई उपनगरात वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीची माहिती देताना कंपनीचे नाव, वीज नियामक आयोगाने वेळोवेळी परवानाचे केलेले नूतनीकरण तारीख, आतापर्यंत कंपनीकडून विविध शुल्कापायी आपल्याकडे जमा झालेली रक्कम आणि शिल्लक रक्कम याची माहिती द्यावी.
२. मेसर्स रिलायंस इन्फ्रास्टक्चर लिमिटेड यांस ग्राहकांचे पैसे वसूल करण्याची परवानगी दिली असल्यास त्याची कॉपी द्यावी.
३. परवाना ज्या नावाने दिला आहे त्या नावाने बॅंकेत खाते न उघडता अन्य नावाने खाते उघडले असून याबाबतीत कंपनीने आपल्याकडे अर्ज केला असल्यास त्याची कॉपी आणि आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

**<u>अपीलकर्ता याच्या मुददा क्र. १ ला उत्तर</u>:-** There are two Distribution Licensees are supplying Electricity in Mumbai, sub-urban area. Details are as under

a) Reliance Infrastructure Ltd - Distribution License No.1 of 2011 dated 11 August, 2011. (case no. 65/2011)
b) Tata Power Company Ltd – Distribution License No. 1 of 2014 dated 14 August, 2014. (Case no. 90 of 2014)

**<u>अपीलकर्ता याच्या मुददा क्र. २ ला उत्तर</u>:-** The Commission has appointed the Tariff vide order dated 21 October, 2016 in case no. 34 of 2016 for MYT period for Financial Year 2016-17 to Financial Year 2019-20.

**<u>अपीलकर्ता याच्या मुददा क्र. ३ ला उत्तर</u>:-** No Such information is available with MERC office.

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण</u> :-**

दिनांक १३/११/२०१७ रोजी माहिती अधिकाराचे फार्ममध्ये नमुद केलेली माहिती अर्धवट दिली असून पूर्ण माहिती देण्यात आलेली नाही.

**<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे</u> :-**

अपिलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती, अपिलीय अधिकारी यांचे समक्ष, सुनावनी दरम्यान पुरवण्यात आली. यावर अपिलार्थी यांना कोणताही आक्षेप नाही. करीता सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

## <u>निर्णय</u>

१) अपिलार्थी यांची अपिल निकाली काढण्यात येत आहे.

11.1.2018

(अनिलकुमार उके)
**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रति,
श्री. अनिल वेदव्यास गलगली,
२, जुना खारवाला चाळ,
काजूपाडा, साकीनाका,
मुंबई- ४०० ०७२.

प्रतीलिपी- जनमाहिती अधिकारी, मविनिआ यांना निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता रवाना.

11.1.2018

(अनिलकुमार उके)
**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**